# तालुका क्रीडा अधिकारी, सामान्य राज्य सेवा, गट-ब

# Taluka Sports Officer, General State Service, Group B

**परीक्षेचे टप्पे: १) लेखी परीक्षा - २०० गुण** **२) मुलाखत - ५० गुण**

## -:परीक्षा योजना:-

| विषय | सांकेतांक | प्रश्नसंख्या | गुण | कालावधी | दर्जा | माध्यम | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| इतिहास, सामान्य विज्ञान व तंत्रज्ञान, भूगोल, बुध्दिमापन चाचणी | ९८४ | १०० | २०० | एक तास | बारावी | मराठी व इंग्रजी | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| चालू घडामोडी, राज्यशास्त्र, अर्थव्यवस्था, क्रीडा | | | | | पदवी | | |

**अ) नकारात्मक गुणदान -**

| |
|---|
| १) प्रत्येक चुकीच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/ कमी करण्यात येतील. |
| २) एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अथवा ज्या उमेदवाराने उत्तरपत्रिकेत पूर्ण वर्तुळ चिन्हांकित केले नसेल अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील. |
| ३) वरीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच राहील व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल. |
| ४) एखाद्या प्रश्नाचे उत्तर अनुत्तरित असेल तर, अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही. |

**ब) अंतिम गुणवत्ता यादी ही वस्तुनिष्ठ परीक्षेतील व मुलाखतीतील एकत्रित गुणांवर आधारीत राहील.**

## -: अभ्यासक्रम :-

| | घटक |
|---|---|
| १ | राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या चालू घडामोडी. |
| २ | भारतीय स्वातंत्र्य लढा व आधुनिक भारताचा इतिहास महाराष्ट्रासह. |
| ३ | भारत आणि महाराष्ट्र- राज्यशास्त्र व प्रशासन, संविधान, राजकीय प्रणाली, पंचायती राज, माहिती अधिकार कायदा. |
| ४ | भारतीय अर्थव्यवस्था व खालील बाबींशी निगडित मुद्दे -<br>१. नियोजन<br>२. संसाधनांचे एकत्रिकरण<br>३. वृद्धी व विकास<br>४. रोजगार<br>५. सर्वसमावेशक वाढ व त्यापासून निर्माण होणारे प्रश्न |
| ५ | सामान्य विज्ञान व तंत्रज्ञान. |
| ६ | महाराष्ट्र, भारत व जगाचा भूगोल महाराष्ट्राच्या भारांशासह. |

| | |
|---|---|
| ७ | क्रीडा - आंतरराष्ट्रीय महत्वाच्या क्रीडा स्पर्धा, खेळाडूंनी विविध स्पर्धांमध्ये नोंदविलेले विक्रम, नामवंत खेळाडूंची आत्मचरित्रे, केंद्र व राज्य शासनाच्या क्रीडा विषयक योजना, केंद्र व राज्य शासनाचे क्रीडा विषयक पुरस्कार, क्रीडा विषयक नियम, क्रीडा स्पर्धांमधील विविध बाबी व उद्भवणारी परिस्थिती . |
| ८ | बुद्धिमत्ता चाचणी -<br>अंकगणित, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, सरासरी, दशांश व अपुर्णांक तसेच बुद्ध्यांक मापन. |

**दिनांक - ३१/०५/२०२३**

**अवर सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**